# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

नॅक अ+ दर्जा प्राप्त

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

तात्काळ परिपत्रक

**विषय : सन-२०२६ च्या खरीप हंगामातील (Triger-1) प्रथम काळ लागू झालेल्या २६५ तालुक्यातील दुष्काळ जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.**

**संदर्भ :**
१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एफईडी-१५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८/१०/१९९३
२. मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/२, दि. २५.०९.२०२६
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१६ यांचे पत्र क्र. उशिस/शिष्य-२०२६-अवर्षण- परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई १३२१७१६, दि. ३०.०९.२०२६
४. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग यांचे पत्र क्र. विसहसं/उशि/छत्रसंवि/स्वायत्त महा./२०२६-२७ दिनांक ०१.१०.२०२६

या परिपत्रकाव्दारे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख व सर्व संलंग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थांचे संचालक यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, आपल्या शैक्षणिक विभाग/महाविद्यालये/परिसंस्था/स्वायत्त संस्थामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या कालावधीमध्ये विद्यापीठ निर्धारित वेळापत्रक २०२६-२७ नुसार आकारण्यात येणारे परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे असे मदत व पुनर्वसन विभाग शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/२, दि. २५.०९.२०२६ अन्वये आदेशित करण्यात आले आहे.

शासन निर्णयास अनुसरुन संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदेशित केल्यानुसार दुष्काळसदृष्य तालुक्यातील महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेतः-

१. संदर्भ क्र. १ येथे नमूद शासन निर्णय दि. १८/१०/१९९३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दुष्काळ सदृष्य तालुक्यातील सवलतीस पात्र विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी परीक्षा फी न घेता त्यांचे आवेदन पत्र विद्यापीठाकडे संदर्भ १ च्या शासन निर्णयांत नमूद केलेल्या प्रमाणपत्रावर साक्षांकित करुन पाठवावे. जर परीक्षा फी घेतली असेल तर अशा मुलांची यादी विद्यापीठास सादर करण्यात यावी.
२. संदर्भ क्र. २ नुसार सन २०२६-२७ च्या दुष्काळसदृष्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी शिक्षण घेत असल्यास सदर लाभार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी भरलेल्या रक्कमेची प्रतीपूर्ती करण्यासाठी त्यांचेकडून आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपूर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

**कृ.मा.पहा**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

नॅक अ+ दर्जा प्राप्त

परीक्षा व मूल्यमापन मंडळ



३. विद्यापीठाच्या संबंधित विभागांनी दुष्काळसदृष्य तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा फी प्रतिपुर्ती करण्यासाठी महाविद्यालयनिहाय आलेल्या आवेदन पत्रावरुन प्रतिपूर्तीची रक्कम परिगणना करुन संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालयाकडे आवश्यक रक्कमेची मागणी करावी.

४. कोणत्याही परिस्थितीत दुष्काळ सदृष्य तालुक्यातील पात्र विद्यार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाही याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर-४३१००४ : **प्रा. (डॉ.) बाबासाहेब एन. डोळे**
संदर्भ क्र. : परीक्षा व मूल्यमापन/२०२६/९०८ : **संचालक**
दिनांक : १२.१०.२०२६ : **परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**या पत्राची पत्र माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तवः**

१. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर
२. मा. कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, प्रशासकीय इमारत, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
३. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे स्वीय सहायक, प्रशासकीय इमारत, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
४. नोडल ऑफीसर, एम.के.सी.एल., राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
५. समन्वयक, एम.के.सी.एल., राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर.
६. कक्ष प्रमुख, सर्व संबंधित कक्ष, राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर